# हवामानबदलाच्या नावाखाली बाजारीकरण : डॉ. शिवा



पुणे : हवामान बदलाविषयी मार्गदर्शन करताना डॉ. वंदना शिवा.

पुणे, ता. १२ : ''आंतरराष्ट्रीय पातळीवर 'हवामान बदला'च्या नावाखाली बाजारीकरण होत आहे. हवामान बदलाचे विपरित परिणाम टाळण्यासाठी विकसनशील देशांनी अर्थव्यवस्थेत बदल करावे, असा दबाव प्रगत देश टाकत आहेत. पॅरिसमध्ये झालेल्या परिषदेत भारताला मदत करण्याची तयारी अनेक विकसित देशांनी दाखविली; परंतु त्यामागे त्यांचा छुपा अजेंडा असल्याने आपण वेळीच सावध राहिले पाहिजे,'' असे मत पर्यावरण चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्या डॉ. वंदना शिवा यांनी व्यक्त केले.

गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स यांच्या वतीने डॉ. शिवा यांचे 'हवामान बदलाविषयक पॅरिसमधील करार : भारत आणि जगाने काय करावे' या विषयावर व्याख्यान आयोजिले होते. या वेळी एच. एम. देसरडा उपस्थित होते.

डॉ. शिवा म्हणाल्या, ''प्रगत देश आपली विचारसरणी आणि औद्योगिक उत्पादने विकसनशील देशांवर थोपविण्याचा प्रयत्न करत आहेत. गेल्या २० वर्षांत अमेरिका आणि युरोपीय देशांमध्ये कार्बन उत्सर्जनात १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. परंतु, हे देश आपली जबाबदारी झटकून आहेत आणि विकसनशील देशांनी कार्बन उत्सर्जन कमी करावे, असे सुचवीत आहेत. प्रगत देश तंत्रज्ञानाचे निमित्त करून विकसित देशातील जीवनशैली, जैवविविधता आणि पारंपरिक शेती उद्ध्वस्त करू पाहत आहेत. हा धोका देशालाही आहे.''